<u>मेसर्स साहनी पॅरिस रॉन लि.</u>

वि

<u>कर संकलक, केंद्रीय उत्पादन शुल्क, हैद्राबाद</u>

नि. ता. **०४/०४/१९९५**

मा. न्यायमुर्ती आर. एम. सहाय, मा. न्यायमुर्ती एस. बी. मुजुमदार आणि मा. न्यायमुर्ती सुजाता व्ही. मनोहर.

केंद्रीय उत्पादन शुल्क व मिठ अधिनियम, १९४४

टेरिफ वस्तू ३० आणि ६८ - 'स्वयं-स्टार्टर मोटर' - जकात कर आकारणी - असे धरण्यात आले की, बाब क्र-६८ नुसार कर लादावा. बाब क्र-३० नुसार लादू नये.

शब्द आणि वाक्प्रचार : ''सॉलेनाईड”, ''ॲप्लीकेशन्स'' आणि ''स्टार्टर'' चा अर्थ

अपिलार्थी करदाती कंपनी मोटार वहानातील 'स्वयं-स्टार्टर मोटारी'चे उत्पादन करीत होती. तिने सदरचे उत्पादन, कर आकारणी दर पत्रकानुसार वस्तू क्र-६८ ला असल्याबाबत वर्गीकरणाची यादी दाखल केली. सहाय्यक कर संकलक यांनी करदात्यांचा मागणी फेटाळून, दरपत्रकातील वस्तू क्र-३० नुसार कर लादला. केंद्रीय जकात कर संकलन यांनी करदात्याने केलेले अपिल फेटाळले. नंतरच्या अपिलात, 'अपिलार्थीने विजेची मोटार म्हणून वस्तू क्र-३० नुसार, त्यांनी बनवलेल्या 'स्वयं-स्टार्टर'वर कर द्यावा' हा कनिष्ठ अधिका-यांचा दृष्टीकोन केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमाशुल्क सोने (नियंत्रण) अपिलेट न्यायाधिकरणाने योग्य ठरवला.

न्यायाधिकरणाच्या निकालाविरुध्द करदात्याने हे अपिल केले आहे. त्यांचे कथन असे की, 'स्वयं-स्टार्टर' मोटर ही विद्युत मोटार नाही. सबब कर दरपत्रकाच्या बाब क्र-६८ उर्वरितमध्ये ती समाविष्ट होते.

न्यायाधिकरणाचा आदेश रद्द करुन, सदरचे अपिल मंजुर करताना, या न्यायालयाने असे धरले की, अपिलार्थी याने बनवलेली 'सेल्फ-स्टार्टर' मोटरीवर तत्कालीन वस्तू क्र-६८ नुसार जकात कर लागू होतो.

२. वस्तू क्र-३० वर केवळ नजर टाकली तरी असे दिसते की, ती यादी सर्व समावेशक असून, तिच्यात विद्युत मोटारीचे सर्व प्रकार आणि भाग आले आहेत. मात्र, त्या नोंदी कितीही सर्वसमावेशक असल्या तरी सुध्दा, तिच्यात विद्युत मोटारी व्यतिरिक्त अन्य कश्याचा वापर करुन निर्माण केलेले उत्पादन नाही. 'सेल्फ-स्टार्टर’ हे उत्पादन असे आहे की, ज्यात 'सॉलेनाईड' शिवाय आणखी काही आहे.

३. शब्दकोषातील 'सॉलेनाईड’, 'ॲप्लीकेशन' आणि 'स्टार्टर' यांचे अर्थ आणि त्यास कसलाही अपवाद, महसूल पक्षाकडून अथवा, त्यांच्या विद्वान वकीलांकडून न येणे यातून अधिक काही सांगण्याची गरज नाही. असे धरावे लागेल की, अपिलार्थी उत्पादित करत असलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटर हे 'सॉलेनाईड' आणि इतर जोडलेली उपकरणे यासहीत बसवलेली विद्युत मोटार आहे. ही केवळ मोटार नसून, तिला जोडलेले इतर भाग देखील सारखेच महत्वाचे आहेत. यासंदर्भात महसुल विभागाच्या विद्वान वकीलांनी असे प्रतिपादन केले की, शब्दकोषातील 'स्टार्टर'चा अर्थ हा देखील हेच स्पष्ट करतो की, 'स्टार्टर' मोटरमध्ये थेट विद्युत प्रवाह असतो. हे खरे की, यात शंका नाही. तथापि, अपिलार्थीने बनवलेला स्टार्टर हा निव्वळ इलेक्ट्रीक मोटार नाही. हे डोळ्यासमोर आणणे सहज शक्य आहे की, केवळ इलेक्ट्रीक मोटारीचे उत्पादन केले म्हणजे ती 'स्टार्टर' सारखी आपोआप काम

करीत नाही. ती यांत्रिक उर्जेने यंत्राचा दांडा फिरवून, मोटार कारचे इंजिन सुरु करु शकत नाही. विद्युत मोटार आणि 'सॉलेनाईड' यांचे इतर सामुग्रीशी अंतर्गत जोडणे याच्या एकत्र परिणामातून स्वयं 'स्टार्टर' मोटारची निर्मिती होते. परिणामतः असे मानावे लागेल की, वस्तू क्र. ३० मधील स्पष्ट भाषेतून अपिलार्थी याने बनवलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटार त्या वस्तूत मोडत नाहीत. जर तसे असेल तर, अपिलार्थी म्हणतो त्या प्रमाणे उर्वरित वस्तू क्र. ६८ मध्ये ते स्वभाविकपणे बसतील. याचा परिणाम म्हणून हे अपील यशस्वी झाले आहे. न्यायाधिकरणाने केलेला आदेश, त्याचप्रमाणे कनिष्ठ अधिकारी यांनी केलेले आदेश रद्द करुन असे धरण्यात आले आहे की, अपीलार्थीने बनवलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटर यावर तत्कालीन वस्तू क्र. ६८ नुसार जकात आकारावी.

संदर्भ - **'द इलस्ट्रेटेड सायन्स ॲन्ड इन्व्हेन्शन एन्सायक्लोपीडिया' आंतरराष्ट्रीय आवृत्ती, वेस्टपोर्ट, कनेक्टिकट**

दिवाणी अपिलेट अधिकार क्षेत्र, दिवाणी अपिल क्र. ३९३९/१९८७.

केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमाशुल्क सोने (नियंत्रण) अपिलेट न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांच्या ता. २४/०९/१९८७ च्या निकाल व आदेशावर

अपिलार्थी तर्फे व्ही. श्रीधरण, भरत दिपक आणि सुरेश व्होरा

उत्तरवादी तर्फे एन. के. बाजपेयी, पी. नरसिंह आणि व्ही. के. वर्मा.

न्यायमुर्ती मुजुमदार यांनी निकाल जाहीर केला.

करदाता अपिलार्थी याने, केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमाशुल्क सोने (नियंत्रण) अपिलेट न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांच्या अ.क्र.ई/टी/१२३८/८२-बी-I ता.

२४/०९/१९८७ च्या निकाला व आदेशावर, केंद्रीय उत्पादन शुल्क व मिठ अधिनियम, १९४४ च्या कलम ३५ ´ल´ खाली सदरचे अपिल दाखल केले आहे. अपिल करण्यास भाग पडलेल्या काही बाबी सुरुवातीला नमुद करणे आवश्यक आहे. अपिलार्थी कंपनी स्वयंचलित वहानांचे विविध सुट्या भागांचे उत्पादन करण्याचा व्यवसाय करते. त्यापैकी एक भाग म्हणजे मोटार वाहनात वापरला जाणारा 'सेल्फ-स्टार्टर'. अपिलार्थी याने दाखल केलेल्या वर्गीकरणाच्या यादीनुसार, टेरिफ वस्तू क्र. ६८ मध्ये हा 'सेल्फ-स्टार्टर' येतो. ही वर्गीकरणाची यादी २०/०६/१९८० ला दाखल करण्यात आली. ता. ०२/०७/१९८१, ला सहाय्यक कर संकलक यांनी अपिलार्थी याने दाखल केलेली यादी परत पाठवून असे निर्देश दिले की, अपिलार्थी याने 'सेल्फ-स्टार्टर मोटार' टेरिफ वस्तू क्र. ३० मधील 'विजेची-मोटार' यात अंतर्भूत करुन, यादी पुन्हा पाठवावी.

त्यानंतर, ता. १३/०७/१९८१ ला, नाखुषीने अपिलार्थी याने सहाय्यक कर संकलक यांच्या निर्देशानुसार वर्गीकरणाची यादी परत पाठवली. ता. २०/०८/१९८१ ला, सहाय्यक कर संकलक यांनी अपिलार्थी याची हरकत झुगारुन, वस्तू क्र. ३० मध्ये 'सेल्फ-स्टार्टर मोटार' दर्शविणा-या वर्गीकरण यादीस मान्यता दिली. सहाय्यक कर संकलक यांनी ता-२०/०८/१९८१ ला, केलेल्या या आदेशाविरुध्द ता-१३/११/१९८१ ला, अपिलार्थी याने कर संकलक, केंद्रीय उत्पादन शुल्क (अपिल) मद्रास यांच्याकडे अपिल केले. ता. २७/०२/१९८२ ला, ते अपिल फेटाळण्यात आले. त्यानंतर याचिकाकर्त्याने भारत सरकारचे अतिरिक्त सचिव, अर्थ मंत्रालय, महसुल विभाग यांच्यासमोर फेरविचार याचिका दाखल केली. ती पुनर्निरीक्षण याचिका न्यायाधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आणि अधिनियमाच्या कलम ३५ प(२) अन्वये अपिल म्हणून त्यावर सुनावणी झाली. ता. २४/०९/१९८७ च्या आदेशानुसार न्यायाधिकरणानी सदरचे अपिल फेटाळले आणि कनिष्ठ अधिका-

यांचे हे मत कायम ठेवले की, 'अपिलार्थी याने तयार केलेला सेल्फ-स्टार्टर' हा इलेक्ट्रीक मोटर असल्याने टेरिफ वस्तू ३० अंतर्गत तिच्यावर कर लावायला हवा.

अपिलार्थी उत्पादन करीत असलेला 'सेल्फ-स्टार्टर' हा, तत्कालीन 'टेरिफ वस्तू' क्र. ३० मध्ये येतो? की, शिल्लक 'टेरिफ वस्तू' ६८ मध्ये तो बसतो ? एवढाच छोटासा प्रश्न आमच्या समोर विचाराधीन आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे की, तो विद्युत मोटार नसल्याने त्याची नोंद उर्वरित भागात होणे आवश्यक आहे. महसुल विभागाचे कथन असे की, टेरिफ वस्तू क्र. ३० या इलेक्ट्रीक मोटार मध्येच तो बसतो.

आव्हानीत निकाल पत्राच्या परिच्छेद १६ मध्ये, न्यायाधिकरण यांनी अपिलार्थी उत्पादन करीत असलेल्या 'सेल्फ-स्टार्टर मोटारीचा' सविस्तर तपशिल दिलेला आहे. न्यायाधिकरणानी असे निरीक्षण नोंदवले आहे की, मोटारवर बसवलेल्या 'सॉलेनाईड'ने तिला विद्युत उर्जेचा प्रवाह मिळतो. जेव्हा तो प्रवाह 'सॉलेनाईड'मध्ये प्रवेश करतो तेव्हा, मऊ लोखंडी 'कोअर-शाफ्ट' त्याच्यामागील 'प्लेट'शी संपर्क साधण्यासाठी ओढला जातो. यातून दोन गोष्टी होतात. त्यापैकी पहिली म्हणजे, 'लिवर' तिच्या वरच्या टोकाला मागे खेचली जाते. अश्या प्रकारे, ती खालच्या टोकाला पुढे ढकलली जाते. ही क्रिया 'दातेरी-गियर'ना 'पिनियन'ला जाळी करण्यास भाग पाडते. दुसरं म्हणजे, मोटर सुरु करण्याचे 'वर्तुळाकार परिक्रमा'(सर्किट) बंद करते. जेव्हा दातेरी गियर 'फ्लाय-व्हील'शी जोडले जाते आणि जाळीचे विभाजन होते. त्यानंतर, सेकंदाने सेल्फ-स्टार्टर मोटरला 'करंट' मिळून रोटर शाफ्ट फिरतो आणि त्यावर चालणारा दातेरी गियरही फिरतो. मग फ्लाय-व्हीलही फिरते. ज्यावेळी इंजिनातून आगीचा वर्षाव होतो. त्यावेळी मोटारीपेक्षा त्याचा वेग वाढतो. त्यामुळे दातेरी गियर आपल्या मुळ स्थितीत पुन्हा फेकले जातात. 'स्टार्टर-मोटर' कसे कार्य करते? याचे हे सुलभ सोपे वर्णन आहे.

प्रत्यक्षात या कार्यात अनेक बारकावे आहेत. तथापि, आपला हेतू हा केवळ 'स्टार्टर-मोटर' ही विद्युत मोटर आहे का? आणि त्यासारखे काम करते का? हे तपासण्याचा आहे. ती केवळ विजेवरच कार्यान्वित होते आणि रोटरी गती बाहेर सोडते. ज्यामुळे मोटर वहानाचे इंजिन सुरु होते. हे खरे की, ते दिर्घ काळ चालत नाही.

अपिलार्थीच्या वकीलांनी असे आवेशाने प्रतिपादन केले की, जरी 'सॉलेनाईड' मार्फत 'सेल्फ-स्टार्टर' मोटरला विद्युत उर्जेचा प्रवाह मिळत असला तरी, सरते शेवटी इंजिनावर आगीचा वर्षाव करणा-या लोखंडी दांडा स्वतःभोवती फिरल्याने, विद्युत उर्जेचे रुपांतर यांत्रिक उर्जेत होते. तथापि, मोटार वहानाला बसवलेल्या अंतर्गत इंजिनाच्या ज्वलनक्रियेशी याचा संबंध येत नाही. त्यामुळे अपिलार्थी तयार करत असलेल्या 'सेल्फ-स्टार्टर' मोटारीचा केवळ विद्युत मोटारीशी संबंध नसून, त्यापेक्षा अधिक काही आहे. तिचा हेतू विजेच्या उर्जेचे विभाजीत सेकंदात उत्सर्जन करणे आणि 'सॉलेनाईड'च्या मदतीने लोखंडी दांडा स्वतःभोवती फिरवून त्यामागील प्लेटला ढकलून आपले कार्य पूर्ण करुन मूळ स्थितीला परत जाणे हा आहे. म्हणून 'सेल्फ-स्टार्टर' मोटार ही विजेची मोटार नाही त्यामुळे टेरिफ वस्तू क्र. ३० मधून तिला बाहेर काढावी.

या संदर्भात 'टेरिफ' (दरपत्रकात) मध्ये काय आहे? याकडे पहाणे आवश्यक आहे. तत्कालीन वस्तू क्र. ३० साठी लागू असलेला भाग खालील कोष्टकात आहे.

वस्तू	दर वर्णन	कार्य
क्र. ३०	इलेक्ट्रीक मोटारींचे सर्व प्रकार आणि त्यांचे भाग	
अ.	पर्यायी प्रवाहावर चालणा-या मोटारी	
१.	एकाच फेजवर चालणा-या मोटारी	२०% जाहिरात मुल्य

२.	तीन फेजवर चालणा-या मोटारी	
i.	७.५ किलोवॅट पेक्षा जास्त नसलेल्या सलग दरासाठी किंवा अल्प काळासाठी किंवा थांबून पुन्हा चालणा-या मोटारी	२०% जाहिरात मुल्य
ii.	७.५ किलोवॅट पेक्षा जास्त दराच्या मोटारी	१०% जाहिरात मुल्य
ब.	थेट प्रवाहाने कार्यान्वित होणा-या मोटारी	
i.	७.५ किलोवॅट पेक्षा जास्त नसलेल्या दरासाठी	२०% जाहिरात मुल्य
ii.	७.५ किलोवॅट पेक्षा जास्त दरासाठी	१०% जाहिरात मुल्य
क.	पर्यायी अथवा थेट करंटने कार्यान्वित होणा-या मोटारी	२०% जाहिरात मुल्य
ड.	विजेच्या मोटारीचे भाग (डाय-कास्ट रोटरर्स सह)	२०% जाहिरात मुल्य

स्पष्टीकरण १. बहू वेगाच्या मोटारींबाबत सर्वाधिक दर हा 'रेटेड-आऊटपुट' मानला जाईल.

स्पष्टीकरण २. ग्रामोफोन किंवा रेकॉर्ड प्लेअर चालवण्याकरीता आणि त्या मोटारींच्या भागाकरीता वापरण्याच्या मोटारींचा समावेश या वस्तूंमध्ये करण्यात आलेला नाही.

स्पष्टीकरण ३. या वस्तूत गियरसहीत मोटारी किंवा गियर (Boxes) पेटयांच्या समावेश आहे.

वरील तक्त्यातील वस्तूंवर केवळ नजर टाकली तरी असे दिसते की, ती यादी सर्व समावेशक असून, तिच्यात विद्युत मोटारीचे सर्व प्रकार आणि भाग आले

आहेत. मात्र, त्या नोंदी कितीही सर्वसमावेशक असल्या तरी सुध्दा, तिच्यात विद्युत मोटारी व्यतिरिक्त अन्य कश्याचा वापर करुन निर्माण केलेले उत्पादन नाही. 'सेल्फ-स्टार्टर’ हे उत्पादन असे आहे की, ज्यात 'सॉलेनाईड' शिवाय आणखी काही आहे.

या विषयी आपण 'द इलस्ट्रेटेड सायन्स ॲन्ड इन्व्हेन्शन एन्सायक्लोपीडिया' आंतरराष्ट्रीय आवृत्ती, वेस्टपोर्ट, कनेक्टिकट चा संदर्भ घेऊ शकतो. वरील ज्ञानकोषाच्या पान क्र. २२२३ व असे नमुद करण्यात आले आहे की, 'स्टार्टर' हे यंत्राच्या दांडयाचा पेच फिरवून, त्या यंत्रास स्वतःभोवती फिरावयास लावणारे आहे. ज्यामुळे इंजिनाच्या इतर वेगापासून स्वतंत्ररित्या ते आपल्या आपण सुरु होते. अंतर्गत ज्वलन इंजिनाचा वापर स्टार्टरमध्ये होतो. जे नेहमी बॅटरीवर चालते ते थेट 'करंट'ने इलेक्ट्रीक मोटारची ताकद ०.५ अश्वशक्ती पर्यंत नेऊन, मोटर सायकल इंजिनाची ताकद मोठ्या डिझेल इंजिनवर १५ अश्वशक्तीपर्यंत नेते.

विशिष्ट तपमान न ओलांडता, थोड्या अवधीत अधिक शक्ती निर्माण करणे, याद्दष्टीने मोटारीची निर्मीती केलेली असते. त्यासाठी इंजिनाच्या घर्षणावर मात करुन, शक्य तितक्या कमी वेळात वेग वाढवून बॅटरीचा अधिक निचरा टाळायचा असतो.

'स्टार्टर' ही इंजिन चालू असतानाची, एक जड वस्तू आहे. त्यामुळे तो शक्य होईल तितका लहान आकाराचा आणि हलक्या वजनाचा पाहिजे. यासाठी त्याचा अवधी दोन किंवा तीन मिनीटांचा असा अगदी अल्प असतो. जर त्यास दिर्घ काळासाठी जास्तीत जास्त ताकदीचा करावयाचा असेल तर, जादा उष्णता टाळण्यासाठी तो मोठया आकाराचा आणि जड वजनाचा करावा लागेल.

स्टार्टरला कार्यान्वित करण्यासाठी 'हेवी करंटची' गरज आहे. मध्यम आकाराच्या मोटारींसाठी १५० ॲम्पीयर तर, मोठ्या आकाराच्या व्यापारी वहानांसाठी १,००० ॲम्पीयर इतका 'करंट' आवश्यक आहे. 'करंट'चे हे स्थित्यंतर 'रिले किंवा सॉलिनाईड'ने केले जाते. वहानाच्या ड्रायव्हींग कॅबमधील चावीने याच्या 'स्वीच'चे नियंत्रण केले जाते.

गियरच्या जोडीमार्फत इंजिन प्रतिबध्द करतात. त्याचे गुणोत्तर १२ः१ असे असते. इंजिनवर मोठ्या आकाराचा गियर असतो तर, लहान आकाराचा गियर ज्याला 'पिनियन' असे म्हणतात तो स्टार्टरच्या दांडयावर असतो. इंजिनच्या क्लचवर मोठ्या आकाराचा म्हणजे रिंग गियर बसवलेला असतो. 'इंट्रेशिया आणि प्रिएंगेज्ड' या दोन पध्दतीने गियरचे काम चालते.

'सॉलेनाईड'चा विचार करता ज्ञानकोषात त्याबाबत खालील महत्वाची माहिती आहे.

'सॉलेनाईड' हे वायरीच्या वेटोळ्याने तयार केलेले एक विद्युत उपकरण आहे. सिलेंडरवर वायरी गुंडाळून ते करता येते. जेव्हा त्या वायरींमधून प्रवाह सोडला जातो तेव्हा चुंबकीय क्षेत्र तयार होते. (इलेक्ट्रो-मॅगनॅटीझम पहा) व्हॉल्व्ह, स्वीच आणि इतर उपकरणे कार्यान्वित करण्यासाठी फेरस कोर हलविण्यासाठी हे केले जाते. सबब, 'सॉलेनाईड' हे विद्युत चुंबकाचे थेट विनियोग आहे.

'सॉलेनाईड'च्या बहुतांश लांबीवर चुंबकीय क्षेत्राचे सामर्थ्य एक सारखे असते. परंतु, त्याच्या कडेला ज्याला 'ध्रुव' म्हणतात तेथे हे क्षेत्र वेगळे असते, ध्रुवाच्या जागी मध्यभागापेक्षा ते सामर्थ्य निम्म्याने कमी होते. 'सॉलेनाईड'च्या मध्ये एका टोकाचे अंतर हे त्याला गुंडाळलेल्या वायरीच्या साडे-तीन पट व्यासाइतके

असते. त्याचे क्षेत्रीय सामर्थ्य ९९% असते. म्हणून, व्यवहारिक दृष्टया 'सॉलेनाईड'ची लांबी ही त्याच्या व्यासाच्या किमान सात पट असावी.
ॲप्लीकेशनबाबत याच शब्दकोषात खालील प्रमाणे आहे.

'सॉलेनाईड'ची चुंबकीय क्षेत्र तयार करण्याची क्षमता, जिचा वापर उपकरणे सुरु करण्याकरता तसेच स्वीचला उर्जा देण्याकरता होतो. त्यास ॲप्लीकेशन किंवा विनियोग म्हणतात. उदा. कारमध्ये स्टार्टर मोटारचे कामी 'सॉलेनाईड' स्वीचचा मोठा वापर केला जातो. 'सॉलेनाईड'चे १. 'ड्रॉ-इन' कॉईल आणि २. 'होल्डींग'कॉईल असे दोन प्रकार आहेत. ते स्टार्टर मोटारच्या माथ्यावर असून, त्या दोन्हीतून प्लंजर असतो.(अश्या प्रकारे जेथे क्षेत्राचे सामर्थ्य एकसारखे आणि जास्तीत जास्त असते तेथे असे असते) प्लंजरचे एक टोक लिवरला जोडलेले असते. ती लिवर फ्लाय-व्हीलमध्ये स्टार्टर मोटरने गुंफलेली असते. प्लंजरचे दुसरे टोक स्वीचला जोडलेले असते.

जेव्हा वहान चालू करण्याची कळ फिरते त्यावेळी 'ड्रॉ-इन' कॉईलमध्ये उर्जा निर्माण होते आणि प्जंजर हा उजवीकडे खेचला जातो. त्यामुळे 'स्टार्टर' मोटर 'फ्लाय-व्हील'शी जोडला जातो. ज्यावेळी प्लंजरचा संपर्क 'होल्डींग' कॉईलशी होतो तेव्हा 'स्टार्टर' मोटरला उर्जा मिळते आणि 'ड्रॉ-इन' कॉईलचे शॉर्ट-सर्किट होते. याचे कारण असे की, प्लंजरला आहे त्या स्थितीत ठेवण्याकरीता ती कॉईल बॅटरीकडून गरजेपेक्षा अधिक शक्ती घेते. त्या शक्तीचा वापर आता स्टार्टर मोटर फिरवायला होतो. जेव्हा इंजिन सुरु होते तेव्हा 'इग्निशन स्वीच' मुक्त होतो. 'होल्डींग' कॉईलचे उर्जोत्सर्जन होऊन, स्प्रिंग प्लंजरला त्याच्या मूळस्थितीत आणते. यामुळे फ्लाय-व्हील पासून स्टार्टर मोटरचे उर्जोत्सर्जन होते.

शब्दकोषातील 'सॉलेनाईड', 'ॲप्लीकेशन' आणि 'स्टार्टर' यांचे अर्थ आणि त्यास कसलाही अपवाद महसूल पक्षाकडून अथवा, त्यांच्या विद्वान वकीलांकडून न येणे यातून अधिक काही सांगण्याची गरज नाही. असे धरावे लागेल की, अपिलार्थी उत्पादित करत असलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटर हे 'सॉलेनाईड' आणि इतर जोडलेली उपकरणे यासहीत बसवलेली विद्युत मोटार आहे. ही केवळ मोटार नसून, तिला जोडलेले इतर भाग देखील सारखेच महत्वाचे आहेत. यासंदर्भात महसुल विभागाच्या विद्वान वकीलांनी असे प्रतिपादन केले की, शब्दकोषातील 'स्टार्टर'चा अर्थ हा देखील हेच स्पष्ट करतो की, 'स्टार्टर' मोटरमध्ये थेट विद्युत प्रवाह असतो. हे खरे की, यात शंका नाही. तथापि, अपिलार्थीने बनवलेला स्टार्टर हा निव्वळ इलेक्ट्रीक मोटार नाही. हे डोळ्यासमोर आणणे सहज शक्य आहे की, केवळ इलेक्ट्रीक मोटारीचे उत्पादन केले म्हणजे ती 'स्टार्टर' सारखी आपोआप काम करीत नाही. ती यांत्रिक उर्जेने यंत्राचा दांडा फिरवून, मोटार कारचे इंजिन सुरु करु शकत नाही. विद्युत मोटार आणि 'सॉलेनाईड' यांचे इतर सामुग्रीशी अंतर्गत जोडणे याच्या एकत्र परिणामातून स्वयं 'स्टार्टर' मोटारची निर्मिती होते. परिणामतः असे मानावे लागेल की, वस्तू क्र. ३० मधील स्पष्ट भाषेतून अपिलार्थी याने बनवलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटार त्या वस्तूत मोडत नाहीत. जर तसे असेल तर, अपिलार्थी म्हणतो त्या प्रमाणे उर्वरित वस्तू क्र. ६८ मध्ये ते स्वाभाविकपणे बसतील. याचा परिणाम म्हणून हे अपील यशस्वी झाले आहे. न्यायाधिकरणाने केलेला आदेश, त्याचप्रमाणे कनिष्ठ अधिकारी यांनी केलेले आदेश रद्द करुन असे धरण्यात आले आहे की, अपीलार्थीने बनवलेले 'सेल्फ-स्टार्टर' मोटर यावर तत्कालीन वस्तू क्र. ६८ नुसार जकात आकारावी.

हे अपिल प्रलंबित असताना, अंतरिम आदेशाने या न्यायालयानी अपिलार्थी याला असे निर्देश दिले होते की, त्यांनी सध्याच्या मागणीनुसार कर भरीत रहावे.

त्या आदेशापासून १४ आठवड्यात वादग्रस्त रक्कमेच्या ५०% रक्कम भरावी आणि बाकीच्या ५०% बाबत १४ आठवड्यात (जर पूर्वी सादर केली नसेल तर) कर संकलक यांच्या समाधानाइतकी 'बॅंक-गॅरंटी' द्यावी. आमच्या आत्ताच्या आदेशाचा विचार करता, थकित मागणीची रक्कम किती भरते? याची आकडेमोड संबंधित विभागाने करावी आणि त्याप्रमाणात कायद्यानुसार अपिलार्थीस मिळणारा परतावा विचारात घेऊन त्यास बॅंक गॅरंटीतून मुक्त केले जाईल. अर्थातच, अधिनियमाच्या कलम ११ ब ची तरतुद लागू होईल आणि त्यानुसार जर सक्षम अधिकारी यांना या आदेशानुसार असे वाटले की, अपिलार्थी हे परतावा मिळण्यास पात्र आहेत तर, बॅंक गॅरंटीचा जबाबदारी आणि जादा जकातकर भरण्याची जबाबदारी यांची आकडेमोड करण्यात यावी. प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेता खर्चाबाबत कोणताही आदेश केलेला नाही.

अपील मंजुर केले आहे.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.